**L. A. BILL No. XXV OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA FELLING OF TREES (REGULATION) ACT, 1964.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.**

**महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६४ चा महा. ३४.

२०२४ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४, यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंच्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम, करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९६४ चा महा. ३४.

(१) खंड (इ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(इ) "झाड तोडणे" यामध्ये, झाड मारून टाकण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळणे किंवा कापणे किंवा छाटणे किंवा बुंध्या भोवतालची साल कोरणे (गर्डलिंग) किंवा झाडाची साल काढणे यांचा समावेश होतो;";

(२) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ग) "नागरी क्षेत्र" याचा अर्थ, ज्या महानगरपालिका क्षेत्रासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम या अन्वये महानगरपालिका घटित करण्यात आली आहे असे महानगरपालिका क्षेत्र, किंवा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) च्या अर्थांतर्गत असलेले असे नगरपालिका क्षेत्र, असा आहे, आणि त्यामध्ये, ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० अन्वये विशेष नगररचना प्राधिकरणाची रचना किंवा नेमणूक करण्यात आली आहे अशा अधिसूचित क्षेत्राचा किंवा ज्या नवीन नगरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३ अन्वये विकास प्राधिकरणाची रचना करण्यात आली आहे अशा नवीन नगराची जागा म्हणून निर्देशित करण्यात आलेल्या क्षेत्राचा समावेश होतो;".

१८८८ चा ३.
१९४९ चा ५९.
१९६५ चा महा. ४०.
१९६६ चा महा. ३७.
१९६६ चा महा. ३७.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मधील, "तो, कलम ३ अन्वये शक्ती प्रदान केलेल्या" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल," या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"तो, पन्नास हजार रुपये इतक्या दंडास पात्र असेल. कलम ३ अन्वये अधिकार प्रदान केलेला वृक्ष अधिकारी, चौकशी केल्यानंतर आणि अशा व्यक्तीस बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, दंड लादील;".

२०२४ चा महा. अध्या. ७.

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील विवक्षित झाडांचे परीरक्षण करण्यासाठी अशी झाडे तोडण्याचे नियमन करण्याकरिता अधिक चांगली तरतूद करण्याबाबत महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा महा. ३४) अधिनियमित केला आहे. तो, नागरी क्षेत्र वगळून संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, वृक्ष अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय झाड तोडल्यास एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाची तरतूद केली होती. उक्त एक हजार रुपयांच्या दंडाच्या कमाल मर्यादेत १९६४ पासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नव्हती. दंडाच्या या अत्यंत किरकोळ रकमेमुळे, झाडांची अनधिकृत तोडणी करण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी झाडे तोडण्याचे प्रभावी नियमन करणे आवश्यक आहे. त्यामुळे, झाडांची अनधिकृत तोडणी केल्याबद्दल कठोर दंडाची तरतूद करणे आवश्यक होती. म्हणून, झाड तोडल्याबद्दल पन्नास हजार रुपये इतक्या दंडाची रक्कम निश्चित करण्यासाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटले.

३. उक्त अधिनियमामधील आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४) यामधील "नागरी क्षेत्र" या संज्ञेची व्याख्या भिन्न असल्यामुळे ते लागू असण्यासंबंधात संदिग्धता निर्माण होत होती. म्हणून, सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ यामध्ये तरतूद केलेल्या व्याख्येसारखीच व्याख्या असावी म्हणून, उक्त अधिनियमामधील उक्त संज्ञेच्या व्याख्येऐवजी, नवीन व्याख्या दाखल करणे प्रस्तावित केले होते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा महा. ३४), यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (२०२४ चा महा. अध्या. ७), हा प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १५ डिसेंबर, २०२४.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**सन २०२४ चे वि.स.विधेयक क्रमांक २५–महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट**

**(महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ यातील उतारे)**

**(सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - ३४)**

व्याख्या

**१.** XX XX XX

**२.** या अधिनियमात, अन्यथा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(अ-१) XX XX XX

(अ) ते (ड) XX XX XX

(इ) "झाड तोडणे" यामध्ये झाडास अतीव नुकसान पोहोचविण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळून टाकणे किंवा कापणे किंवा छाटणे या गोष्टीचा समावेश होतो ;

(फ) ते (फफ) XX XX XX

(ग) "नागरी क्षेत्र" याचा अर्थ, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपालिका समिती नगर समिती किंवा त्या त्या वेळे पुरता अमंलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेली अधिसूचित क्षेत्र समिती किंवा कटक यांच्या हद्दीतील क्षेत्र असा आहे; आणि त्यात पाच हजारपेक्षा कमी लोकसंख्या नसणा-या आणि तीन-चतुर्थांशपेक्षा कमी पुरूष कामगार बिगरशेतकी धंद्यामध्ये गुंतलेले नसणा-या, राज्य शासनाने राजपत्रामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा स्थानिक क्षेत्राचा समावेश होतो;

(ह) XX XX XX

**३.** XX XX XX

**३ अ.** XX XX XX

कलम ३ चे उल्लंघन करून झाडे तोडल्याबद्दल शास्ती.

**४.** कोणतेही झाड तोडण्यासाठी [२] [परवानगी देण्यात आलेली नसताना किंवा देण्यात आली असल्याने मानता येत नसताना] कोणत्याही व्यक्तीने कोणतेही असे झाड तोडल्यास किंवा तोडावयास लावल्यास, तो कलम ३, अन्वये शक्ती प्रदान केलेल्या [३] [वृक्ष अधिका-याने] चौकशी केल्यानंतर आणि अशा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर जी शिक्षा देणे त्यास योग्य वाटेल अशा एक हजार रूपयाहून अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि शासनाची मालमत्ता नसणारे अशा रीतीने तोडलेले कोणतेही झाड [४] [व असे कोणतेही झाड तोडण्यासाठी आणि ते वाहून नेण्यासाठी वापरण्यात आलेली हत्यारे, नावा, वाहने किंवा वाहतुकीची इतर साधने] राज्य शासनाकडे सरकारजमा [४][होतील] असा आणखी आदेश [३][वृक्ष अधिका-यास] देता येईल.

**५.** ते **१५.** XX XX XX

**अनुसूची.** XX XX XX

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५. ]**

**[ महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री. **]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.